MHPU250013742021

## फौ. कि. अर्ज क्र.२८७/२०२१ मधील निशाणी १४ वरील आदेश

१) जाबदेणार यांनी प्रस्तुतचा अर्ज, अर्जदाराचे पुर्वी झालेल्या लग्नाचा घटस्फोटाचा लेख याकामी दाखल करण्याचा आदेश अर्जदार हिचेविरुध्द होण्याकरीता दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अर्जातील जाबदेणाराचे कथनानुसार, अर्जदाराने जाबदेणार यांना दि. ०२.१२.२०२१ रोजी ॲड. गोसावी यांचेमार्फत उत्तरी नोटीस पाठविलेले असून सदरची प्रत नि. ०३ यादीसोबत दाखल केलेली आहे. सदर नोटीशीचे उत्तरात अर्जदाराने तिचा जाबदेणार यांचेसोबत झालेल्या विवाहापुर्वी अन्य विवाह झाला असल्याची वस्तुस्थिती नमुद करुन पहिल्या लग्नाचा घटस्फोट झाल्याचे कथन केलेले आहे. मात्र, सदर पहिल्या लग्नाच्या घटस्फोटाबाबत कोणताही लेख न्यायालयात सादर केलेला नाही. अर्जदाराने घटस्फोटाबाबत नोटीशीत दिशाभुल करणारे कथन केलेले असून पहिला विवाहाचा घटस्फोट झालेला नसतांना न्यायालयाची दिशाभुल करुन अंतरिम आदेश मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. अर्जदाराचे पहिल्या विवाहाचा घटस्फोटाचा लेख याकामी दाखल होणे आवश्यक असल्याने अर्ज मंजुर करुन अर्जदारास सदरचा लेख दाखल करण्याबाबत आदेश व्हावा अशी विनंती केली.

३) जाबदेणार यांचे प्रस्तुत अर्जास अर्जदारतर्फे नि. १६ वर म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविलेली आहे. अर्जदाराचे म्हणण्यानुसार, जाबदेणार करीत असलेली मागणी चुकीची व बेकायदेशीर असून सुमारे एक वर्षानंतर दाखल केलेल्या जाबदेणार यांचे जबाबात अर्जदाराशी त्यांचा विवाह दि. ०६.१२.२०१९ रोजी पुणे येथे पार पडला असल्याचे नमुद करुन अर्जदारास

धर्मपत्नी म्हणून मान्य केलेले आहे.

**४)** पुढे अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, जाबदेणार करीत असलेल्या दस्ताची मागणी रास्त व बरोबर नसून सदरचा अर्जावर अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. अर्जातील अंतरिम पोटगीचे कामकाज चालू असून जाबदेणार करत असलेली मागणी पुराव्यात देखील करु शकतात. तसा काही दस्त जाबदेणार यांचेकडे असेल तर त्याने तो पुराव्याचे कामी दाखल करणे क्रमप्राप्त ठरते, मात्र अर्जदाराने असा कोणताही दस्त अर्जदाराकडे उपलब्ध नसून अर्जदाराने तो दस्त कधीही केलेला नाही. जाबदेणाराने सदर प्रकरणाचे कामी योग्य त्या न्यायालयात गेले पाहिजे. जाबदेणारास या अर्जातील अंतरिम पोटगीचे कामकाज लांबविण्यासाठी व अर्जदारास त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. अर्जदार ही आजमितीस हलाखीचे जीवन जगत असून तिला अंतरिम पोटगीची आवश्यकता आहे. जाबदेणार याने अर्जदारास घरातून हाकलून दिल्याने तिला नाईलाजाने माहेरी राहावे लागत असून जाबदेणार हा औषधपाणी, कपडालत्त्यासाठी अर्जदारास एकही पैसा देत नसून तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने ती खुप त्रासात जीवन जगत आहे. या परिस्थितीची जाबदेणारास माहिती असून पुराव्याचे कामी सर्व तो खुलासा होणार आहे. त्यामुळे जाबदेणाराचा अर्ज मंजुर झाल्यास अंतरिम अर्जाचे कामकाज लांबणीवर पडून अर्जदारावर उपासमारीची वेळ येणार असल्याने जाबदेणार यांचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**५)** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने मुळे अर्ज हा कौटूंबिक हिंसाचार कायदा कलम १२ अन्वये दाखल केलेला असून मुळ अर्जातील अंतरिम पोटगी अर्ज अदयाप न्यायप्रविष्ठ आहे. अर्जदारातर्फे नि. ०३ चे कागदयादीसोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, जाबदेणार यांचेतर्फे पाठविलेली नोटीस दि. २०.११.२०२० चे नोटिशीस उत्तर अर्जदारातर्फे दि. ०२.१२.२०२० रोजी दिल्याचे दिसून येते. सदर उत्तरी नोटीसमधील नमुद वस्तुस्थिती पाहता, अर्जदाराचे प्रथम विवाहाबाबत व घटस्फोटाबाबत

जाबदेणार यांना पुर्व कल्पना दिल्याचे व सदरील घटस्फोटाचा लेख व लेखाची प्रत जाबदेणार यांना दिल्यानंतर ते अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांच्या विवाहास तयार झाल्याबाबतचा मजकुर नमुद असल्याचे आढळते. मात्र, नि. १६ वरील म्हणण्यात अर्जदार हिचेकडे प्रथम विवाहाचे घटस्फोटाबाबत कोणताही दस्त तिचेकडे उपलब्ध नसल्याचे अथवा अर्जदाराने केलेला नसल्याचे नमुद करते. सदर वर नमुद केलेल्या वस्तुस्थितीवरुन अर्जदाराचा प्रथम विवाह झाल्याचे दोन्ही बाजुंना मान्य असून सदर विवाहाचे घटस्फोटाचे लेखाबाबत वेगवेगळी कथने केल्याचे आढळते. जाबदेणार यांचे अर्जातील कथनानुसार, सदरचे घटस्फोटाचा लेख अर्जदार यांचेकडे असून तिने तो दाखल करावा अशी मागणी केलेली आहे. याउलट, अर्जदाराने सदरचा दस्त तिचेकडे नसल्याचे म्हणण्यामध्ये नमुद केलेले आहे.

**६)** याठिकाणी भारतीय पुरावा कायदा कलम १०३ पाहता, *‘‘कोणत्याही विशिष्ट तथ्यासंबंधीच्या शाबीतीची जबाबदारी एखादया विशिष्ट व्यक्तीवर राहील असा कोणत्याही कायदयाने उपबंध केलेला नसेल तर, जी व्यक्ती न्यायालयाला त्या तथ्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्याचे आवाहन करेल तिच्यावर त्या तथ्याच्या शाबीतीची जबाबदारी राहील.’’* सदर तरतुदीनुसार, जी व्यक्ती एखादा दस्त अस्तित्वात असल्याचे कथन न्यायालयासमोर करते त्या व्यक्तीवरच सदरचा दस्त शाबीत करण्याची जबाबदारी निश्चित होते. त्यामुळे या ठिकाणी जर अर्जदार सदरचा दस्त तिचेकडे नाही अथवा तीने केलाच नाही असे कथन करत असेल तर तो दस्त पुराव्याचे कामी दाखल करण्यास किंवा शाबीत करण्याची संपुर्ण जबाबदारी जाबदेणार यांचेवर निश्चित होईल.

**७)** भारतीय पुरावा कायदा, कलम ६५(क) नुसार, *‘‘मुळ लेख नष्ट किंवा गहाळ झालेला असेल अथवा त्यातील मजकुराचा पुरावा देवू पाहणारा पक्षकार त्याचे स्वत:च्या कसूरीमुळे किंवा हयगयीमुळे नव्हे तर अन्य कारणामुळे, तो वाजवी अवधीत हजर करु शकत नसेल तेव्हा त्यास दस्तऐवजासंबंधीचा*

<u>*दुय्यम पुरावा देता येतो.*</u>'' सदर तरतुदीनुसार, जाबदेणार यांना अर्जात नमुद दस्ताबाबत दुय्यम पुरावा अर्जदार व जाबदेणार यांचे पुराव्याचे दरम्यान देता येईल. त्याचप्रमाणे जाबदेणार यांनी त्यांचे सदरचे अर्जात मांडलेल्या तक्रारीचे स्वरुप पाहता, त्या अनुषंगाने जाबदेणार यांना योग्य त्या न्यायालयात आवश्यक ती दाद मागता येईल. अर्जदाराने दाखल केलेल्या मुळ अर्जाचे स्वरुप व सद्य स्थिती पाहता, कागदपत्रे दाखल करण्यासंबंधीचा अर्ज पुराव्याचे वेळी विचारात घेणे न्यायाच्या दृष्टीने रास्त ठरेल. सबब, वर नमुद परिस्थिती विचारात घेवून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) जाबदेणार यांचा प्रस्तुतचा अर्ज नि. १४ नामंजुर करण्यात येतो.

२) जाबदेणार यांना प्रस्तुत अर्जाचे कामी स्वत:चे पुराव्यादरम्यान अर्जात नमुद केलेल्या दस्ताबाबत दुय्यम पुरावा सादर करण्याची मुभा देण्यात येते.

Digitally signed by PRATAP VISHNU SAPAKAL
Date: 2022.04.16 17:57:17 +0530

दिनांक:— १६/०४/२०२२ (पी. व्ही. सपकाळ)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जुन्नर

## **शेरा**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | |
|---|---|
| न्यायालयाचे नांव | : पी. व्ही. सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जुन्नर |
| लघुलेखकाचे नांव | : ए. के. मते |
| निकाल तारीख | : ०९/१०/२०२१ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : ०९/१०/२०२१ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : ०९/१०/२०२१ |